सोलापूर विद्यापीठ
**कुलसचिव कार्यालय (पात्रता विभाग )**
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव,
सोलापूर - ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७७८ (११ lines)
विस्तृत क्र. ११६ फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल : registrar@sus.ac.in

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

**Solapur University**
**Registrar Office (Eligibility Section)**
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
EPABX No.0217- 2744778 (11 lines)
Ext. No. 116 Fax No.0217-2744770
Web Site : http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
email id: registrar@sus.ac.in

जा.क्र.सोविसो/पात्रता विभाग/२०१६-१७/ 11689 दि. 29 DEC 2016

**(परिपत्रक क्रमांक -१०)**

**प्रति,**
प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
सोलापूर विद्यापीठ,सोलापूर

**विषय :-** विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील त्रुटींची पुर्तता करण्यास मुदतवाढ दिल्याबाबत..
**संदर्भ :-** पात्रता परिपत्रक क्र.०१ सोविसो /पात्रता विभाग/२०१६-१७/५६७० दि.१७/०६/२०१६

**महोदय/ महोदया,**

संदर्भिय परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **Admission** या **Link** वर **Eligibility** या मथळयाखाली उपलब्ध असून कृपया त्याचे अवलोकन व्हावे.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील ऑनलाईनव्दारे कळविलेल्या त्रुटींची पूर्तता ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत करण्याच्या सुचना संदर्भाधीन परिपत्रक क्र.०१ च्या बाब क्र. १३ अ) नुसार कळविण्यात आल्या होत्या. परंतु चालू वर्षातील प्रवेशास १२ वी पुरवणी परीक्षेमुळे प्रवेश प्रक्रियेस उशीर झालेला आहे.

उक्त परिस्थिती विचारात घेता आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, संदर्भिय परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या पात्रता अर्जातील त्रुटींची पुर्तता करण्यास दि. ३१ डिसेंबर, २०१६ ऐवजी १५ जानेवारी, २०१७ पर्यंत मुदत वाढ देण्यात येत आहे.

तरी संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाकडून ऑनलाईन माध्यमातून कळविलेल्या त्रुटींची पुर्तता वाढवून दिलेल्या मुदतीमध्ये म्हणजेच दि. १५ जानेवारी, २०१७ पर्यंत करण्याची योग्य ती दखल घ्यावी. जे महाविद्यालय मुदतवाढ दिलेल्या मुदतीमध्ये त्रुटींची पूर्तता करणार नाहीत, अशा महाविद्यालयांकडून प्रति विद्यार्थी रु.५००/- प्रमाणे दंडाची रक्कम आकारुनच संबंधित विद्यार्थ्यांच्या पात्रता कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू

**प्र.कुलसचिव**

**प्रत :**

१. पी.जी.प्रवेश विभाग
२. संलग्नता विभाग
३. परीक्षा विभाग ( संगणक केंद्र)
४. ई- सुविधा विभाग
५. एम.के.सी.एल. विभाग
६. वित्त व लेखा विभाग